महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : एमआयएस-०१२२/प्र.क्र.२०/२०२२/३१ दिनांक - २५ ऑगस्ट, २०२३

## - : **प्रसिद्धीपत्रक**:-

**विषय :**- लिपिक टंकलेखक-२०२१ व कर सहायक-२०२१ या संवर्गांच्या टंकलेखन कौशल्य चाचणीबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक ३१ मे, २०२३ रोजी लिपिक टंकलेखक व कर सहायक या संवर्गांसाठी टंकलेखन कौशल्य चाचणी आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुत टंकलेखन कौशल्य चाचणीसाठी उपस्थित उमेदवारांनी टंकलिखित केलेले एकुण शब्द, बरोबर शब्द व चुकीचे शब्द ही माहिती उमेदवारांना अवगत करण्यासाठी आयोगाच्या संकेतस्थळावरील Candidates Information >Result>Results of Examination/Recruitment येथे 'Declaration of total words typed, correct words typed & incorrect words typed by candidates in typing skill test dated 31 May, 2023 of Clerk Typist- 2021 & Tax Assistant-2021' या सदराखाली प्रसिध्द करण्यात येत आहेत.

**२.** प्रस्तुत टंकलेखन कौशल्य चाचणीसाठी उपस्थित उमेदवारांनी टंकलिखित केलेले परिच्छेद (Response Sheet) उमेदवारांच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. उमेदवारांच्या प्रोफाईलमध्ये Response Sheet उपलब्ध करून देण्यात आल्या नंतर उमेदवारांनी ती त्या दिनांकापासून तीस दिवसांत download करून ठेवणे आवश्यक आहे. तद्नंतर सदर Response Sheet उमेदवारांच्या प्रोफाईलमध्ये दिसणार नाही, तसेच Response Sheet बाबतच्या मागणीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**३.** आयोगाच्या दिनांक २० जुलै, २०२३ रोजीच्या समक्रमांकाच्या प्रसिध्दीपत्रकात नमुद केल्यानुसार प्रस्तुत संवर्गांसाठी दिनांक ३१ मे, २०२३ रोजी घेण्यात आलेल्या मराठी टंकलेखन कौशल्य चाचणीमध्ये पहिल्या १५०० key depression नुसार २३६ शब्द तयार होतात. त्यानुसार पात्रतेसाठी अराखीव उमेदवारांना ९३% च्या निकषानुसार २१९ बरोबर शब्द व राखीव उमेदवारांना ९०% च्या निकषानुसार २१२ बरोबर शब्द टंकलिखित करणे आवश्यक होते.

तसेच इंग्रजी टंकलेखन कौशल्य चाचणीमध्ये पहिल्या २००० key depression नुसार ४०० शब्द तयार होतात. त्यानुसार पात्रतेसाठी अराखीव उमेदवारांना ९३% च्या निकषानुसार ३७२ बरोबर शब्द व राखीव उमेदवारांना ९०% च्या निकषानुसार ३६० बरोबर शब्द टंकलिखित करणे आवश्यक होते.

**४.** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: अपंग-२०१६/प्र.क्र.११६/१६-अ, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१८०/२८, दिनांक १३ जुन, २०१९ नुसार अनुक्रमे पात्र दिव्यांग व माजी सैनिक उमेदवारांना टंकलेखन अर्हता चाचणी अनिवार्य नाही. यास्तव सदर उमेदवारांचा टंकलेखन कौशल्य चाचणीतील टंकलेखनाचा विचार न करता मुख्य परीक्षेतील गुणवत्तेनुसार विचार करण्यात आला आहे.

ठिकाण : नवी मुंबई

सह सचिव,
दक्षता, धोरण व संशोधन,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग